**नियमित दिवाणी दावा क्रमांक ५८२/२०२० मधील अर्ज**
**(निशाणी क्रमांक १३) वरील आदेश**
(सीएनआर क्र.एमएचएएच०८-००१०९२-२०२०)

प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्रमांक १ ते ५ यांनी कैफियत दाखल करण्याकरीता झालेला विलंब माफ करून त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्याकरीता दाखल केला आहे. अर्जातील मजकुराच्या पुष्ठयर्थ प्रतिज्ञापत्र (नि.क्र.१४) देण्यात आले आहे.

२. अर्जातील थोडक्यात कथन खालील प्रमाणे -

प्रतिवादी क्रमांक १ ते ५ हे सदर प्रकरणात दिनांक ०६.१०.२०२० रोजी वकीलांमार्फत हजर झाले आहेत. तथापि, दरम्यानचे काळात कोरोनाचा प्रादुर्भाव असल्यामुळे प्रतिवादींना विहीत कालावधीमध्ये कैफियत अभिलेखावर दाखल करता आली नाही. सदर विलंब जाणीवपुर्वक केलेला नाही. सबब, कैफियत दाखल करण्याकरीता झालेला विलंब माफ करुन कैफियत अभिलेखावर दाखल करून घेण्याची विनंती प्रतिवादी क्रमांक १ ते ५ यांनी केली आहे.

३. वादीला सदर अर्जास म्हणणे दाखल करण्याची संधी देण्यात आली. वादीतर्फे विधिज्ञांनी अर्जावरच म्हणणे दाखल करून अर्जास हरकत घेतली आहे. अर्जातील कारण संयुक्तिक नाही, दाव्याचे कामकाज लांबविण्याच्या हेतुने वेळेत कैफियत दाखल केली नाही, त्यामुळे अर्ज रद्द करण्यात यावा, अशी मागणी वादीतर्फे करण्यात आली आहे.

४. उभय पक्षांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा दावा मिळकती संदर्भात निरंतर मनाई हुकुम होवुन मिळण्याकरीता दाखल केला आहे. दाव्याचे कामकाज अदयाप सुरुवातीच्या टप्प्यावरच आहे. प्रतिवादी क्रमांक १ ते ५ यांना दाव्याकामी कैफियत दाखल करून म्हणणे मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. त्याने दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्यास मदत होणार आहे. प्रतिवादी क्रमांक १ ते ५ यांना कैफियत देण्याची संधी दिल्याने वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. विलंबाचे कारण संयुक्तीक आहे. मात्र त्याचवेळी प्रतिवादी क्रमांक १ ते ५ ला कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्यानंतर न्यायालयात हजर होवुन लवकरात लवकर कैफियत दाखल करता आली असती. मात्र प्रतिवादींनी तसे केलेले नाही. वेळेत कैफियत दाखल न केल्याने दाव्याचे कामकाजात विलंब झाला आहे, हे देखील लक्षात घेणे आवश्यक आहे. त्याबाबतचा खर्च वादीला या प्रतिवादींकडुन मिळणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्रमांक १ ते ५ यांनी वादीला एकत्रितपणे रक्कम रूपये ५००/- खर्च देण्याच्या अटीवर कैफियत दाखल करण्याकरीता झालेला विलंब माफ करून त्यांची कैफियत अभिलेखावर घेणे उचित होईल. पर्यायाने प्रस्तुत अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

**आदेश**

१. प्रतिवादी क्रमांक १ ते ५ यांनी वादीला एकत्रितपणे रक्कम रुपये ५००/- (अक्षरी रुपये पाचशे मात्र) खर्च देण्याचे अटीवर प्रस्तुत अर्ज (नि.क्र.१३) मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्रमांक १ ते ५ यांनी वादीला उपरोक्त नमुद खर्च रक्कम दिल्यावर त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात येईल.

ठिकाण :- संगमनेर.
दिनांक :- २४.०९.२०२१.

(ज्यो. वि. पेखळे-पुरकर)
३ रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
संगमनेर.